Estd 1962

Naac 'A++' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# २९/८/२०२१

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील मार्च/एप्रिल २०२१ च्या परीक्षा दि.१० ऑगस्ट २०२१ पासून ऑनलाईन पध्दतीने सुरळीतपणे सुरु झाल्या.

आज दि. २९ ऑगस्ट २०२१ रोजी **Environment Studies** या अभ्यासक्रमाची परीक्षा पार पडली. आजच्या या परीक्षेसाठी ५२२५७ विद्यार्थ्यांपैकी ५०५५७ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा दिली. ऑनलाईन परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना काही तांत्रिक अडचण उद्‌भवू नये यासाठी तांत्रिक अडचणीचे निराकरण करणेसाठी परीक्षा विभागातील अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच सॉफ्टवेअर पुरवठादार कंपनीची यंत्रणा कार्यरत ठेवण्यात आली होती.

बुधवार दि.१८ ऑगस्ट २०२१ रोजी पार पडलेल्या परीक्षांमध्ये ज्या विद्यार्थ्यांना तांत्रिक कारणास्तव त्यांची परीक्षा देता आली नाही अशा विद्यार्थ्यांनी सदर परीक्षेची माहिती पुढील लिंकद्वारे त्यांचे निवेदन ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालित सादर करावे. लिंक पुढीलप्रमाणे आहे.

**unishivaji.ac.in / online.unishivaji.ac.in या वेबसाईट पोर्टलवर —**

**Link –**

**Application for re-examination of students who had technical problems in the examination held on 18/8/2021**

तसेच विद्यापीठामार्फत देण्यात येणा—या अधिकच्या सूचना विद्यार्थ्यांना त्वरित समजता याव्यात यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचे संकेतस्थळ, स्वत:चा ईमेल तसेच नोंदणीकृत मोबाईल वारंवार पाहून पुढील कार्यवाही करावी.

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचेमार्फत आयोजित करण्यात येत असलेली ''स्वयंम'' परीक्षा ही दि.२८ व २९ ऑगस्ट २०२१ रोजी आहे तर महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळामार्फत आयोजित करण्यात आलेली स्पर्धा परीक्षा ही दि.२० ऑगस्ट २०२१ रोजी आहे. तरी सदर परीक्षेस जे विद्यार्थी बसणार आहेत अशा विद्यार्थ्यांचीच पुनर्परपरीक्षा विद्यापीठ घेणार आहे. त्यासाठीचे वेळापत्रक परीक्षा विभागामार्फत यथावकाश जाहीर करण्यात येईल. सबब उपरोक्त नमूद केलेल्या परीक्षेस जे विद्यार्थी बसतील अशा विद्यार्थ्यांची माहिती योग्य त्या कागदपत्रासह (संबंधित परीक्षेचे हॉल तिकीट, विद्यापीठ परीक्षा ॲडमिट कार्ड) इ. महाविद्यालयाने संबंधित ऑन परीक्षा विभागाकडे दि.३१ ऑगस्ट २०२१ पर्यंत कळवावी.

त्याचप्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत ''महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट — ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२०'' ही परीक्षा दि.४ सप्टेंबर २०२१ रोजी आयोजित करण्यात आली असल्याने सदर दिवशी विद्यापीठाचे होणारे सर्व पेपर्स हे दुस—या दिवशी म्हणजेच दि.५ सप्टेंबर २०२१ रोजी पूर्वी जाहीर केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे आयोजित करण्यात येत असल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक श्री.गजानन पळसे यांनी महाविद्यालयास केले.